श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर न्यास (प्रभादेवी) मुंबई

S.K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-28
☎ : 022-62491111 / 62491112

(Controlled by Govt. Of Maharashtra)
www. siddhivinayak.org
email :admin@siddhivinayak.org
info@siddhivinayak.org

दिनांक :25/11 /२०२४

# दरपत्रके मागविण्यासंदर्भातील सूचना

विषय : बॅनर्स (२ वर्षाच्या कालावधीकरीता) प्रिंटींग करून लावण्याचे कंत्राट देण्यासाठी सिलबंद दरपत्रके मागविण्याबाबत.

अंगारक संकष्ट चतुर्थी, माघ श्रीगणेश जयंती महोत्सव, भाद्रपद गणेशोत्सव, विविध सण, तसेच न्यासातर्फे राबविण्यात येणारे सामाजिक शिबीर व कार्यक्रमांचे बॅनर्स (२ वर्षाच्या कालावधीकरीता) प्रिंटींग करून लावण्याचे कंत्राट देण्यासाठी सिलबंद दरपत्रके मागविण्यात येत आहेत. याबाबतची संपूर्ण माहिती, अटी व शर्ती न्यासाच्या www.siddhivinayak.org या संकेतस्थळावर अपलोड करण्यात आली आहे.

## अटी व शर्ती –

१) सिलबंद लखोटयावर ठळक अक्षरात दरपत्रकाचा विषय स्पष्टपणे नमूद करावा. दरपत्रके दोन लिफाफ्यात सादर करावीत. एका लिफाफ्यात (Technical Bid) यामध्ये कंपनीची माहिती, मोबाईल क्रमांक,कामाच्या अनुभवाचे प्रमाणपत्र,जीएसटी प्रमाणपत्राची प्रत, पॅन कार्डची प्रत इ, दुसऱ्या लिफाफ्यात (Financial Bid) मूल्य दरपत्रक याप्रमाणे दोन वेगवेगळया **लखोटयामध्ये भरुन लाखेने सिलबंद करुन** सदर लिफाफे दि. 02/ 12 /२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजेपर्यंत मंदिर प्रतिक्षालय इमारत तळमजला येथील आवक–जावक नोंदणी विभागामध्ये सादर करावी.

२) बॅनर्स प्रिंटींग करुन तयार झाल्यानंतर न्यासाने नेमून दिलेल्या ठिकाणी बॅनर्स लावण्याची व पुन्हा काढण्याची संपूर्ण जबाबदारी आपली राहील. न्यासाने नेमून दिलेल्या ठिकाणी बॅनर्स लावल्याबाबतचा छायाचित्र तपशील देयकासोबत जोडण्यात यावा. छायाचित्र तपशील देयकासोबत जोडला नसल्यास देयक अदा करण्यात येणार नाही याची प्रकर्षाने नोंद घ्यावी.

३) आपल्या क्षेत्रात करीत असलेल्या कामाचा १० वर्षाचा अनुभव असल्याबाबतची प्रमाणपत्रे सादर करावी. आपण करीत असलेल्या कामाचा दर्जा उत्तम प्रकारचा असावा.

४) दरपत्रकधारकाचे कार्यालय न्यास कार्यालयापासून २०–२५ किमी अंतरावर असणे आवश्यक आहे. जेणेकरुन न्यासास त्वरीत सेवा उपलब्ध करुन देणे शक्य होईल.

५) मागील ३ वर्षाची आर्थिक उलाढाल कमीत कमी १५ ते २० लक्ष असावी. याबाबत सीए प्रमाणपत्र दरपत्रकासोबत सादर करावी.

६) दरपत्रक भरताना सर्व प्रकारचे कर मिळून एकत्रित रक्कम भरावी. दरपत्रक भरताना न्यासाने दिलेल्या दरपत्रकातच दर भरुन देणे आवश्यक आहे. न्यास दरपत्रकात दर भरुन न दिल्यास सदर कंपनीस अपात्र ठरविण्यात येईल. दरपत्रकधारकाने दर नमूद करताना बॅनर्स लावण्याच्या खर्चासह अंर्तभूत करून दर देण्यात यावेत.

७) न्यासाने नेमून दिलेली कामे विहित वेळेत न केल्यास वा काम न्यासाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार न आढळल्यास, कामात दिरंगाई होत असेल, अथवा कामात असमाधानकारक परिस्थिती आढळून आल्यास किंवा कोणताही वाद निर्माण झाल्यास दरपत्रक रद्द करण्याचा अधिकार न्यासास असेल.

८) नियमानुसार आवश्यक आयकर रक्कमेची कपात करणेत येईल. तसेच सर्व प्रकारचे कर अदा करणेची जबाबदारी दरपत्रकधारक यांची राहील.

९) दरपत्रकधारकाने GST क्रमांक व PAN कार्ड दरपत्रकांत नमूद करावा. (सोबत प्रत जोडावी.)

१०) दरपत्रकधारकाने GST क्रमांक लागू नसल्यास, कंपनी लेटरहेडवर तसे नमूद करून न्यास दरपत्रकासोबत सादर करावे.

११) माहितीची आवश्यकता असल्यास श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई कार्यालयात दूरध्वनी क्र. ०२२–६२४९१११५ वर न्यासाचे पर्यवेक्षक, श्री. मंगेश कुंटे यांच्याशी संपर्क साधावा.

१२) दि. 03/12/२०२४ रोजी दुपारी ०२.०० वाजता दरपत्रके उघडण्यात येतील. दरपत्रके उघडताना दरपत्रकधारकाने सदर दिवशी उपस्थित रहाणे आवश्यक आहे. दरपत्रकधारक दरपत्रके उघडताना उपस्थित न राहिल्यास दरपत्रक उघडल्यानंतर आपले कोणतेही म्हणणे मान्य केले जाणार नाही. दरपत्रके उघडल्यानंतर दरपत्रकामध्ये कोणतेही बदल करण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

Patil

कार्यकारी अधिकारी

श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर न्यास (प्रभादेवी) मुंबई

S.K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-28
☎ : 022-62491111 / 62491112

(Controlled by Govt. Of Maharashtra)
www. siddhivinayak.org
email :admin@siddhivinayak.org
info@siddhivinayak.org

# दरपत्रकाचा तपशील

विषय : बॅनर्स (२ वर्षाच्या कालावधीकरीता) आर्टवर्कसहीत प्रिंटींग करून लावण्याचे कंत्राट देण्यासाठी सिलबंद दरपत्रके मागविण्याबाबत.

नाव:------------------------------------------------------------

पत्ता:------------------------------------------------------------

------------------------------ मोबाईल क्रमांक : ----------------------

जीएसटी क्रमांक : ---------------------- पॅन कार्ड क्रमांक : ----------------------

| अ.क्र. | तपशील | प्रति स्क्वे.फूट, दर (सर्व करांसहित) |
|---|---|---|
| १ | फ्लेक्स बॅनर (260 GSM), ४ पास्ट प्रिंटींग | |
| २ | फ्लेक्स बॅनर (260 GSM), ४ पास्ट प्रिंटींगसह १.५ इंच लाकडाच्या पटटीवर स्टेपल करून देणे. | |
| ३ | विनाइल प्रिंटींग | |
| ४ | ॲक्रीलीक बॅनर व प्रिंटींग | |
| ५ | न्यासाने नेमून दिलेल्या ठिकाणी बॅनर्स लावणे व काढणे याकरीता मनुष्यबळ व वाहतुक खर्च. | |
| | **एकूण खर्च रक्कम रू.** | |

टिप – वरील सर्व बॅनर्सचे दर पुरवठा आदेशाच्या दिनांकापासून पुढील २ वर्षाच्या कालावधीकरीता लागू असतील. (नेमून दिलेल्या ठिकाणी बॅनर्स लावण्याची व पुन्हा काढण्यासहीत संपूर्ण जबाबदारी आपलीच राहील.)

दरपत्रकधारकाची सही व शिक्का